मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २५१ ■ रविवार, २४ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# रायगड जिल्ह्यात १८ मे अखेर ६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

## ६४ गावे व २३० वाड्यांतील १ लाख १३ हजार ७०९ नागरिकांना दिलासा

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद रायगडच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत विविध तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दि18 मे 2026 अखेर जिल्ह्यात एकूण 64 टँकर कार्यरत असून त्याद्वारे64 गावे व 230 वाड्यांमधील 1लाख13 हजार 709 नागरिकांना पिण्याचे पाणी



उपलब्ध करून देण्यात येत आहे.

जिल्ह्यातील सर्व टँकर खासगी स्वरूपातील असून शासकीय टँकर अथवा मदतीचे टँकर कार्यरत नाहीत. सर्वाधिक टंचाईग्रस्त परिस्थिती पेण तालुक्यात असून येथे 9 गावे व 76 वाड्यांसाठी12 टँकर कार्यरत आहेत. या माध्यमातून 24हजार 765 नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे.

महाड तालुक्यात 14 गावे व 87वाड्यांसाठी 9 टँकरद्वारे 22हजार 243 नागरिकांना पाणीपुरवठा सुरू आहे. पनवेल तालुक्यात 10 गावे व 8 वाड्यांसाठी9 टँकरद्वारे 18 हजार553नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. कर्जत तालुक्यात 3गावे व 11 वाड्यांसाठी8 टँकर, खालापूर तालुक्यात 5 गावे व 9 वाड्यांसाठी 6 टँकर, तर माणगाव तालुक्यात 4गावे व15 वाड्यांसाठी 5 टँकर कार्यरत आहेत.

याशिवाय अलिबाग तालुक्यात 4गावे, उरण तालुक्यात4 वाड्या, सुधागड-पाली तालुक्यात 2 वाड्या, रोहा तालुक्यात 3गावे, पोलादपूर तालुक्यात 5 गावे व14 वाड्या, म्हसळा तालुक्यात6 गावे व 1वाडी, तसेच श्रीवर्धन तालुक्यात 1 गाव व 3वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेकडून पाणीटंचाईग्रस्त भागांवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## थोडक्यात

### प्रवासादरम्यान सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** एसटीने प्रवास करत असताना 55 वर्षीय इसमाकडील सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 22 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. निवास दत्तात्रय कदम हे आझादपूर, कोरेगाव, सातारा येथे राहत असून 20 मे रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास आझादपूर, कोरेगाव, सातारा ते श्री गणेश सोसायटी नावडे फेस 2 या दरम्यान एसटीने आणि रिक्षाने प्रवास करत असताना प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्याकडील सोन्याची गंठण, टॉप्स, सोन्याची फुले, चैन आणि रोख रक्कम असा एकूण सात लाख 66 हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात 22 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

### शिवीगाळ करून बघून घेण्याची दिली धमकी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : फळ विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या इसमाला शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिल्या प्रकरणी विलास म्हात्रे (राहणार ओवे गाव) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 21 मे रोजी तक्रार दाखल करण्यात आली. सलीम छोटे शेख हा ओवेगाव येथे फळ विक्रीचा व्यवसाय करतो. यावेळी विलास म्हात्रे यांनी त्या ठिकाणी जाऊन ती जागा माझी आहे दुकान लावायचे पैसे द्यावे लागतील असे त्याला सांगितले. यावेळी सलीम याने पैसे देण्यात नकार दिला. यावेळी त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. आणि म्हात्रे यांनी त्याला शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिली.

### डिझेलची चोरी, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : डिझेलच्या टाकी मधून डिझेल चोरल्या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात 22 मे रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राम प्रताप नेपाल राजभर यांनी 22 मे रोजी ट्रेलर पार्क केला आणि ते चहा पिण्यासाठी रस्त्याच्या पलीकडे गेले. यावेळी अज्ञात इसमाने ट्रेलरच्या मुख्य डिझेलच्या टाकीमधून अडीचशे लिटर 23 हजार 250 रुपयांचे डिझेल चोरले.

### दांडक्याने डोक्यात मारहाण करून केले जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : लाकडी दांडक्याने 24 वर्षीय तरुणाच्या डोक्यात मारहाण करून त्याला जखमी केल्याप्रकरणी दोघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.ऋतिक काशिनाथ वाघमारे (वय 24 राहणार देवळोली) हा घरी असताना त्याच्या बाजूला राहणारे दशरथ वाघमारे आणि विलास वाघमारे यांनी ऋतिक त्याच्या घरी येऊन त्याला शिवीगाळ आणि दमदाटी केली तसेच लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण करून त्याला जखमी केले.

### सिद्धेश्वर पतसंस्थेत सहकार महर्षी दादासाहेब पालोदकर यांना अभिवादन



**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर छत्रपती संभाजीनगर** : सिद्धेश्वर नागरी सहकारी पत संस्था म. सिल्लोड या संस्थेच्या कार्यालयात सिल्लोड तालुक्याचे विधाते सहकार महर्षी माजी मंत्री कै. दादासाहेब पालोदकर यांची २४ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कै. दादासाहेब पालोदकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी सिल्लोड-सोयगाव मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार, संस्थेचे चेअरमन रामदास पालोदकर, जिल्हा परिषद सदस्य देविदासराव पालोदकर, संस्थेचे संचालक सागर पालोदकर, निलेश अवकाळे, दादाराव पंडीत, राजेंद्र अंबट, दिलीपसिंग परदेशी तसेच इतर मान्यवर विनोद मंडलेचा, कृष्णा पाटील पालोदकर, मुकेश पालोदकर, निखिल पालोदकर, संजय डमाळे, अनिल पालोदे, शामराव कोल्हे, संजय साळवे, सखाराम अहिरे, शिवा टोंपे, कृष्णा वाघ, धनंजय कुलकर्णी, गौरव सहारे, प्रफुल हुरणे, व संस्थेचे व्यवस्थापक भानुदास जंजाळ, कर्मचारी गणपत सोनवणे, दत्ता पाईकराव, किशोर पांडे, सुभाष गोसावी, यांची उपस्थिती होती.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त पनवेल येथे "एक कृतार्थ संध्याकाळ" साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखेच्यावतीने कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त "एक कृतार्थ संध्याकाळ" या विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवार दिनांक २६ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे संपन्न होणार आहे.या कार्यक्रमात "लोकनेता" या प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन, निमंत्रितांचे कवी संमेलन तसेच अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे



म्हणून महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत, कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, लोकनेते रामशेठ ठाकूर, पानिपतकार ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ज्येष्ठ कवी व चित्रपट निर्माते दिग्दर्शक रामदास फुटाणे, सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी अशोक नायगांवकर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर, कोमसापचे कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ, ज्येष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे, युवा नेते नगरसेवक परेश ठाकूर, सुप्रसिद्ध गझलकार ए.के.शेख तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त प्रा.एल.बी.पाटील, आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोमसापचे गणेश कोळी आणि संजय गुंजाळ यांनी केले आहे.

## स्वाधार' अर्जातील त्रुटी दुरुस्तीसाठी २७ मेपर्यंत मुदत; विद्यार्थ्यांना आवाहन

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी : विश्वदीप कांबळे** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये आढळलेल्या त्रुटी दुरुस्त करण्यासाठी २७ मे २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी मुदतीत आवश्यक कागदपत्रे व माहिती अपलोड करून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे.अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असूनही जागेअभावी प्रवेश घेऊ शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट आर्थिक मदत जमा केली जाते.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नवीन अथवा नूतनीकरणासाठी ऑनलाइन अर्ज केलेल्या काही विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये तपासणीदरम्यान त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज दुरुस्तीसाठी पुन्हा त्यांच्या स्टुडंट लॉगिनवर पाठविण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक लॉगिनमध्ये जाऊन आवश्यक माहिती व कागदपत्रे मुदतपूर्वक अपलोड करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कपडे धुण्यासाठीही अयोग्य असलेले पाणी नागरिकांनी प्यावे कसे? कळंबोलीकरांचा संतप्त सवाल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी/दीपक कोळवणकर** : कळंबोली परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. मागील दोन दिवसांपासून परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून, नळातून येणारे पाणी इतके गढूळ आहे की ते कपडे धुण्यासाठीदेखील अयोग्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत हेच पाणी पिण्यासाठी कसे वापरायचे, असा संतप्त सवाल कळंबोलीकरांकडून उपस्थित केला जात आहे.

स्थानिक नागरिकांनी या समस्येबाबत सिडको प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कळंबोली शाखाध्यक्ष श्री. स्वप्नील (मंदा) यशवंत घाडगे यांनी युवक आधारच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले की, "गेल्या अनेक महिन्यांपासून नागरिकांकडून तसेच विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांकडून सिडकोचे संबंधित अधिकारी प्रफुल डावरे यांच्याकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र या गंभीर प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असून, कोणतीही प्रभावी कारवाई किंवा कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली दिसून येत नाही."

घाडगे पुढे म्हणाले की, "पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे. गढूळ पाण्यामुळे नागरिकांना विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे. सिडको प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून तातडीने



पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करावी आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे."

दरम्यान, गढूळ पाण्याचे फोटो आणि व्हिडिओ नागरिकांकडून सोशल मीडियावर प्रसारित केले जात असून, या प्रकारामुळे सिडको प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांनी या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.कळंबोलीसारख्या विकसित नोडमध्ये नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नसेल, तर ही अत्यंत गंभीर बाब असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## खत,बी -बियाणे योग्य दरात द्या, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे निवेदन!

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : मानवत/ तालुक्यातील शेतकऱ्यांना खते बी -बियाणे योग्य आणि रास्त दरात उपलब्ध करून द्यावेत या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने मानवत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले खरीप हंगाम तोंडावर आलेला असताना खत बी बीयाण्याच्या दरवाढीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे कृषी विक्रेत्यांनी खताची चढ्या दराने विक्री करू नये तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने खत व बी बियाणे वाटप करण्यात यावे अशी मागणी संघटनेने केली आहे मानवत तालुक्यांत खतांचे पुरेसा साठा उपलब्ध असताना काही विक्रेत्यांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे यावेळी निवेदन देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मानवत तालुकाध्यक्ष नामदेव काळे दत्तराव परांडे यांच्या सह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत

## सिद्धिविनायक दर्शनासाठी भाविकांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( दादर) प्रतिनिधी: मयूर प्रकाश** : भाविकांचा प्रवास अधिक सुलभ, जलद आणि सोयीस्कर व्हावा यासाठी ए-८१४ बससेवा आजपासून भाविकांच्या सेवेत रुजू! श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) मा. श्री. सदा सरवणकर यांच्या संकल्पनेतून आणि विशेष पाठपुराव्यातून, तसेच बेस्ट समिती अध्यक्षा सौ. तृष्णा विश्वासराव यांच्या सहकार्याने या विशेष बससेवेचे लोकार्पण आज संपन्न झाले. या प्रसंगी न्यासाचे कोषाध्यक्ष पवन त्रिपाठी, विश्वस्त मीनाताई कांबळी, राहुल लोंढे, जितेंद्र राऊत, सुदर्शन सांगळे अनेक मान्यवर उपस्थित होते.

दादर स्थानक ते रवींद्र नाट्य मंदिर मार्गे थेट श्री सिद्धीविनायक मंदिर अशी धावणारी ही



विशेष बसफेरी असून, बाप्पाच्या दर्शनासाठी मुंबईसह देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे. प्रत्येक भाविकाचा प्रवास विघ्नहर्ता गणरायाच्या कृपेने सुखाचा आणि मंगलमय व्हावा हीच प्रार्थना! अशी भावना श्री सदा सरवणकर यांनी व्यक्त केली.

# मानवतेच्या पवित्र आध्यात्मिक नवीन युगाचा उत्सव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** अत्यंत भक्ती, आध्यात्मिक आनंद आणि शांत आदराच्या वातावरणात, मुंबईतील बहाई समुदाय २३ मे रोजी सायंकाळी बहाई केंद्रात बाब यांच्या घोषणेचा पवित्र उत्सव साजरा करण्यासाठी एकत्र जमला होता. हा तो क्षण होता ज्याने मानवतेच्या आध्यात्मिक इतिहासात एका नवीन युगाच्या पहाटेची घोषणा केली.

या कार्यक्रमात १८४४ सालच्या त्या ऐतिहासिक रात्रीचे स्मरण करण्यात आले, जेव्हा इराणमधील शिराझ येथील एक तरुण व्यापारी असलेल्या बाब यांनी आपले दिव्य कार्य घोषित केले आणि जगातील धर्मांच्या पवित्र ग्रंथांमध्ये सांगितलेले प्रतिज्ञात पुरुष, बहाउल्लाह यांच्या लवकरच होणाऱ्या आगमनाची घोषणा केली.

तीव्र छळ, तुरुंगवास आणि अखेरच्या हौतात्म्यानंतरही, त्यांच्या शिकवणींनी मानवतेला बहाई धर्माचे संस्थापक बहाउल्लाह यांच्या आगमनासाठी तयार केले, ज्यांच्या दूरदृष्टीने मानवजातीच्या एकतेची आणि सार्वत्रिक शांततेच्या स्थापनेची मागणी केली.



स्त्री-पुरुषांची समानता, विज्ञान आणि धर्माचा सुसंवाद, पूर्वग्रहांचे निर्मूलन, सार्वत्रिक शिक्षण, न्याय आणि सर्व लोक व राष्ट्रांची मूलभूत एकता. सहभागींनी आशा व्यक्त केली की हे आदर्श आजच्या समाजात अधिक सामंजस्य, करुणा आणि सामूहिक कृतीसाठी प्रेरणा देऊ शकतील.

जगभरातील बहाईंसाठी, बाब यांची घोषणा ही बहाई दिनदर्शिकेतील नऊ पवित्र दिवसांपैकी एक आहे आणि मानवजातीच्या आध्यात्मिक व सामाजिक उन्नतीसाठी समर्पित असलेल्या जागतिक चळवळीची सुरुवात म्हणून याला गहन आध्यात्मिक महत्त्व आहे. मुंबई बहाई समुदाय बहाई केंद्र मुंबई यांच्या वतीने सांगण्यात आले.

# सद्भावना वृद्धाश्रमात निराधार वृद्धांना मोफत आधार

## अंथरुणाला खिळलेल्यांसाठीही विशेष सेवा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** वाढते शहरीकरण, तुटत चाललेली संयुक्त कुटुंब व्यवस्था आणि वृद्धांकडे होणारे दुर्लक्ष या पार्श्वभूमीवर गुजरातमधील राजकोट येथे उभारण्यात आलेला "सद्भावना वृद्धाश्रम" अनेक निराधार वृद्धांसाठी आशेचा किरण ठरत आहे. "जगातील सर्वात मोठा वृद्धाश्रम" असा दावा करण्यात आलेल्या या प्रकल्पामध्ये निराधार, आजारी, अंथरुणाला खिळलेले तसेच कर्करोग आणि कोमाग्रस्त वृद्धांना पूर्णपणे मोफत निवारा, वैद्यकीय उपचार आणि मानवी आधार दिला जात आहे.

विनुभाई बघुभाई नारोळा यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या




वृद्धाश्रमात वृद्धांना केवळ राहण्याची सोय नाही, तर त्यांना सन्मानाने जगण्याची संधी दिली जात आहे. तब्बल ४०० खाटांची व्यवस्था असलेल्या या प्रकल्पात सध्या ७०० हून अधिक ज्येष्ठ नागरिक राहत असून, अनेक वृद्धांना आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात माणुसकीचा आधार मिळत आहे.

वृद्धाश्रमामध्ये नियमित आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, मानसिक समुपदेशन, पौष्टिक आहार, औषधोपचार आणि मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अंथरुणाला खिळलेल्या वृद्धांसाठी स्वतंत्र विभाग तयार करण्यात आला असून, प्रशिक्षित कर्मचारी दिवस-रात्र सेवा देत आहेत. कर्करोग आणि कोमामध्ये असलेल्या रुग्णांसाठी विशेष काळजी घेतली जात असल्याचे संस्थेने सांगितले.

संस्थेच्या माहितीनुसार, वृद्धाश्रमात धर्म, जात, भाषा किंवा आर्थिक स्थिती न पाहता गरजू वृद्धांना प्रवेश दिला जातो. "प्रत्येक वृद्धाला कुटुंबासारखी वागणूक मिळाली पाहिजे," या भावनेतून संपूर्ण प्रकल्प उभारण्यात आल्याचा दावा संस्थेने केला आहे.

या परिसरात मोठे सभागृह, वाचनालय, आध्यात्मिक कार्यक्रमांसाठी जागा तसेच विरंगुळ्यासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. वृद्धांचे मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमही आयोजित केले जातात.

समाजातील नागरिकांनी निराधार, असहाय्य किंवा अंथरुणाला खिळलेले वृद्ध आढळल्यास त्यांना सद्भावना वृद्धाश्रमात आणण्यासाठी मदत करावी, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे. "कोणीही वृद्ध एकटा राहू नये," हा संदेश देत हा प्रकल्प सध्या देशभरात चर्चेचा विषय ठरत आहे.

# अर्धवेळ स्त्री परिचर यांचा विजयी मेळावा संपन्न ;

## एक जून योजना कर्मचारी मुंबई मोर्चात शकडो कामगारांनी केला जाण्याचा संकल्प

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड: प्रतिनिधी/सय्यद इसा :** नांदेड सीटू संलग्न अर्धवेळ स्त्री परिचर संघटनेचा विजयी मेळावा २२ मे रोजी जिल्हा परिषदेच्या उमेद सभागृहात सपन्न झाला.१९६६ पासून कार्यरत असलेल्या कामगार महिलांच्या संघटनेने गेल्यावर्षी सीटू कामगार संघटनेसोबत संलग्नता केली आहे.त्यानंतर सीटू च्या वतीने मोर्चे आंदोलने करून आपल्या विविध मागण्यासाठी मंत्री यांचे लक्ष वेधले होते.तसेच मंत्रालयात पाठपुरावा केला होता. त्यामुळे अर्धवेळ स्त्री



परिचर यांच्या मानधनात तीन हजार रुपये वाढ करण्यात आली आहे.

पूर्वी तीन हजार अशा तुटपुंज्या मानधनावर काम करून आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालवीणाऱ्या महिलांना तीन हजार रुपये दरमहा वाढ झाल्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे.त्या मुळे विजयी मेळावा घेण्यात आला असून नूतन हंगामी कमिटी निवडण्यात आली आहे.यावेळी सीटू राज्य सचिव तथा जिल्हाध्यक्षा कॉ.उज्वला पडलवार, संघटनेच्या राज्य कार्याध्यक्ष कॉ. सुनीता सावंत, सीटू जिल्हा जनरल सेक्रेटरी तथा शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.गंगाधर गायकवाड आदींनी मेळाव्यास संबोधित केले.नूतन जिल्हाध्यक्ष पदी कॉ.लक्ष्मी ताई बोडकेतर सचिव पदी कॉ.पभावती दूधमल यांची एकमताने निवड करण्यात आली.मुंबई मंत्रालयावर दि. १-२ आणि ३ जून रोजी सीटू च्या नेतृत्वाखाली भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असून त्या योजना कर्मचाऱ्यांच्या मोर्चात नांदेड जिल्ह्यातील शकडो कामगार कर्मचारी जाणार असल्याचा संकल्प महिला कामगारांनी केला आहे.

# बकरी ईद निमित्त पनवेल येथे रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर :** पनवेल मधील विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने, MGM हॉस्पिटल व दारुल अमन ट्रस्ट यांच्या सहकार्याने ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त भव्य रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

धर्माने सांगितलेल्या "त्याग" या महान मूल्याला अनुसरून सर्व धर्मीयांनी एकत्र येत मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील गरजू रुग्णांसाठी रक्ताची गरज लक्षात घेऊन नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदानासारख्या श्रेष्ठ कार्यात सहभाग नोंदवावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

**शिबिराचे तपशील पुढीलप्रमाणे:**

स्थळ: दारुल अमन ट्रस्ट मशीद, डी मार्ट जवळ, सेक्टर-1/S, नवीन पनवेल (पश्चिम)

दिनांक: रविवार, २४ मे २०२६

वेळ: सकाळी ९.०० ते दुपारी ३.००

अधिक माहितीसाठी संपर्क:

अब्दुल हमीदखान इनामदार – ९३२२२२४९२०

सय्यद सरवर – ९८२१३३३००४

तनुश्री – ९२२४७६००५६

अल्लाउद्दीन शेख – ८०८०४५४५५५

अरिफ कुरेशी – ९३२४४३१२४१

अशरफुद्दीन काझी – ९८६७४७२६९१

हाजी सय्यद – ९८९२३८६७८४

सहभागी संस्था:

दारुल अमन ट्रस्ट, महा. अंनिस पनवेल, MMNF पनवेल, मकतब-ए-नूरुल उलूम, ए. एफ. टी. ट्रस्ट, मिशन माणुसकी, ग्राम स्वराज्य समिती, महाराष्ट्र.

# आला आला वारा संगे पावसाच्या धारा

## आष्टी तालुक्यातील काही गावांमध्ये पावसाने लावली हजेरी

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** रुई नालकोल,चौभा निमगाव, नांदा,वटनवाडी,जळगाव तसेच आष्टी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावल्याची माहिती समोर आली आहे.अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला असून,काही भागांत झाडे पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर घराचे व फळबाग पडझड तातडीचे रुई नालकोल येथे पंचनामे करण्यात आले तलाठी दिलीप कनेरकर साहेब सरपंच तात्यासाहेब नालकोल,उपसरपंच विष्णू मांढरे, दादासाहेब नालकोल सर,हरी नालकोल नागरिकांनी पंचनामा करण्यास मदत केली, मोठ्या प्रमाणामध्ये घरांचे पत्रे उपर झाड तसेच निमोणे,मक्का,कडवळ उन्हाळी बाजरी जनावराचा चारा यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पावसामुळे हवेतला उकाडा कमी होऊन वातावरणात छान गारवा निर्माण व





उघड्यापासून काही दिलासा मिळत आहे हवामान विभागानेही मराठवाड्यात मेघगर्जना,विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला होता.

# पनवेलमध्ये स्वस्त प्लॉटचे आमिष; 'फार्म एन लँड'कडून 30 लाखांची फसवणूक, संचालकाविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल परिसरात कमी दरात जमीन व प्लॉट मिळवून देण्याचे आमिष दाखवत सहा गुंतवणूकदारांची तब्बल 30 लाख रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी 'फार्म एन लँड' कंपनीचा संचालक रवींद्र रोहिदास नायक याच्याविरोधात सानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, याच आरोपीविरोधात यापूर्वीही अशाच प्रकारच्या आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून त्याला अलीकडेच अटक करण्यात आली होती.

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या आर्थिक गुप्तवार्ता कक्षाला 'फार्म एन लँड' कंपनीमार्फत जमीन विक्रीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सानपाडा येथील सेक्टर 30 ए मधील जी स्क्वेअर बिझनेस पार्कमधील कंपनीच्या कार्यालयाची आणि संबंधित व्यवहारांची पडताळणी करण्यात आली. तपासादरम्यान काही गुंतवणूकदारांकडून लाखो रुपये स्वीकारूनही जमीन त्यांच्या नावावर करण्यात आलेली नसल्याचे उघड झाले. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी रवींद्र नायक याने सोशल मीडियासह विविध माध्यमांतून पनवेल परिसरात कमी दरात प्लॉट उपलब्ध असल्याच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या होत्या. प्रति गुंठा अडीच लाख ते साडेतीन लाख रुपयांत जमीन मिळणार असल्याचे सांगून गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात आले. त्यानंतर संबंधितांना साई-पनवेल परिसरातील जागांची पाहणी करून देण्यात आली. काही प्रकरणांत शेतकऱ्यांसोबत व्यवहार सुरू असल्याचे भासवून विश्वास संपादन करण्यात आला. गुंतवणूकदारांकडून पूर्ण रक्कम स्वीकारल्यानंतर जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया मात्र पुढे नेण्यात आली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधितांना जमीन ताब्यात मिळाली नाही किंवा व्यवहार पूर्ण करण्यात आला नाही. या प्रकारात सहा गुंतवणूकदारांची एकूण 30 लाख 9 हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले



आहे. या प्रकरणी सानपाडा पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, आरोपी रवींद्र नायक याच्याविरोधात यापूर्वी सीबीडी बेलापूर पोलिस ठाण्यातही अशाच प्रकारच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या प्रकरणात त्याला 14 मे रोजी अटक करण्यात आली होती. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना जमीन किंवा प्लॉट खरेदीपूर्वी संबंधित कागदपत्रांची शहानिशा करण्याचे तसेच आकर्षक दरांच्या आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

# इंदापूर तहसील कार्यालयात लोकशाही दिनावर प्रश्नचिन्ह; पारदर्शकतेसाठी ग्राहक संघटनेचे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** इंदापूर तहसील कार्यालयामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या "लोकशाही दिन" प्रक्रियेत पारदर्शकता व उत्तरदायित्व राखण्याच्या मागणीसाठी जागृत ग्राहक राजा ग्राहक संघटना, इंदापूर तालुक्याच्या वतीने तहसील कार्यालयास निवेदन देण्यात आले आहे. "लोकशाही दिन" हा शासनाचा नागरिकाभिमुख उपक्रम असून, नागरिकांना त्यांच्या तक्रारी, समस्या, अर्ज व निवेदने थेट प्रशासनासमोर मांडता यावीत आणि त्यावर तत्काळ सुनावणी व कार्यवाही व्हावी, या उद्देशाने तहसील, पंचायत समिती,जिल्हाधिकारी कार्यालय आदी स्तरावर नियमित बैठका आयोजित केल्या जातात. या बैठकींमध्ये विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्यांचे निवारण करण्याची प्रक्रिया राबवली जाते.




निवेदनात म्हटले आहे की, मागील तीन ते चार महिन्यांपासून इंदापूर तहसील कार्यालयात लोकशाही दिन आयोजित करण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास येत असून, त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी व अर्जांच्या निवारण प्रक्रियेवर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.लोकशाही दिन नियमितपणे आयोजित केला जात आहे का, बैठका कधी झाल्या, कोणते अधिकारी उपस्थित होते तसेच प्राप्त अर्जांवर कोणती कार्यवाही करण्यात आली याची माहिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

तसेच, लोकशाही दिनाच्या बैठकींची दिनांकवार यादी, उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती, प्राप्त अर्जांची यादी, अर्जांवरील कार्यवाही अहवाल (ATR), विविध विभागांना देण्यात आलेल्या नोटिसांच्या प्रमाणित प्रती, उपस्थिती पत्रक, इतिवृत्त पुस्तिका (Minutes Book), निर्णय नोंदी तसेच संबंधित शासन निर्णयांची माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

जर इंदापूर तहसील कार्यालयात लोकशाही दिन आयोजित केला जात नसेल, तर त्याबाबत कारणासह लेखी स्पष्टीकरण देण्यात यावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.हे निवेदन स्वाती राऊत, निवासी नायब तहसीलदार, इंदापूर यांना देण्यात आले. यावेळी जागृत ग्राहक राजा ग्राहक संघटनेचे इंदापूर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न घाडगे तसेच ऊर्जा प्रमुख तानाजी खैरे उपस्थित होते.

माहिती आठ दिवसांच्या आत उपलब्ध न केल्यास किंवा माहिती दडपण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधित प्रकरण महाराष्ट्राचे राज्यपाल, पुणे जिल्हाधिकारी, बारामती उपविभागीय अधिकारी तसेच अन्य सक्षम प्राधिकरणांकडे तक्रार स्वरूपात सादर करण्यात येणार असल्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

# शांताई इंग्लिश स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवी या परीक्षेचा अंतिम निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे यामध्ये शांताई इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज रामपुरी या एक विद्यार्थी पात्र ठरला आहे व तीन विद्यार्थी पात्र होण्यास एक ते दोन मार्कांनी कमी आहेत. इयत्ता पाचवीतून चि. शिवराज गणेशराव लव्हाळे पात्र झाला आहे. तसेच चि. पृथ्वीराज लक्ष्मण मस्के याने 142 मार्क ,सोहम ज्ञानेश्वर गर्दे यांनी 137 मार्क व कु.समीक्षा सुरेश घटमल यांनी 118 मार्क व तनुश्री बालासाहेब देवडे यांनी 111 मार्क मिळवलेले आहेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री अमोल सर व शाळेच्या प्राचार्य श्रीमती तेजस्विनी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांचे या यशाकरता शाळेचे प्राचार्य व सर्वशिक्षक शिक्षिकाश्री




मस्के जी के सर सुरवसे सर,खरात सर,राखुंडे सर, कोमल मिस,धनश्री मिस,शितल मिस यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे गट अध्ययन नियमित भरपूर वाचन व सराव प्रश्नसंच सोडून आलेल्या अडचणी लगेच सोडवल्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढला आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि अध्ययन प्रक्रिये केलेले व्यवस्थापन यामधून शैक्षणिक उपक्रम राबवण्याची राबविण्याची मध्ये शांताई इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज रामपुरी नेहमीच आघाडीवर असून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सर्व शिक्षक नियमित कार्यतत्पर असतात.

# मुदखेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी सुरू असलेल्या साखळी उपोषणाला पत्रकार परिषदेचा जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- योगेश चौदंते** : मुदखेड शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मारोती डुबुकवाड यांनी सुरू केलेल्या साखळी उपोषणाला मुदखेड मराठी पत्रकार परिषदेकडून जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.




यावेळी पत्रकार परिषद पदाधिकाऱ्यांनी उपोषण स्थळी भेट देत आंदोलनास नैतिक समर्थन व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व समाजातील सर्व घटकांना प्रेरणा मिळावी, यासाठी मुदखेड शहरात भव्य पूर्णाकृती पुतळा उभारणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते मारोती डुबुकवाड यांनी प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला.

यावेळी पत्रकार परिषद सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कै. माणिकरावदादा पालोदकर यांना अभिवादन

## सिल्लोडमध्ये २४ व्या पुण्यस्मरणानिमित्त विविध संस्थांतर्फे आदरांजली

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्याच्या शैक्षणिक, आर्थिक व सहकार क्षेत्राचा पाया रचणारे सिद्धेश्वर अर्बन को-ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष कै. माणिकरावदादा पालोदकर यांच्या २४ व्या पुण्यस्मरणानिमित्त सिल्लोड शहरासह तालुक्यात आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी विविध संस्थांमध्ये आयोजित कार्यक्रमांत त्यांच्या भरीव कार्याच्या आठवणींना मान्यवरांनी उजाळा दिला.

कै. पालोदकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळण्यासाठी 'राजर्षी शाहू शिक्षण संस्थेची' स्थापना केली. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना व सिद्धेश्वर सूतगिरणीची उभारणी केली. सर्वसामान्यांसाठी त्यांनी सुरू केलेल्या सिद्धेश्वर अर्बन बँक व नागरी सहकारी पतसंस्थेचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. त्यांच्या याच अमूल्य योगदानाला स्मरून सिद्धेश्वर बँक, पतसंस्था, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व कृषी उत्पन्न बाजार समिती येथे अभिवादन सभा झाल्या.



सिल्लोड.सिध्देश्वर अर्बन को ऑप बँक कै.माणिकराव दादा पालेदकर यांचे पुण्यस्मणार्थ अभिवादन करतांना बँकेचे उपाध्यक्ष विनोद मंडलेचा डॉ. प्रा.राहुल पालोदकर, काशिनाथ पा.जंजाळ, पुर्णेराव साळवे व संचालक,कर्मचारी व आदि मान्यवर.

याप्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष विनोद मंडलेचा, राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर, बाजार समितीचे माजी सभापती काशिनाथ मामा जंजाळ, बँकेचे संचालक उत्तम

**कार्याच्या आठवणींना उजाळा**

रणदिवे, सुरेश अपार, संजय जाधव, तसेच पुर्णेराव साळवे, कौतिकराव बडक, पंडितराव गोडसे, मधुकर बर्डे, टी. बी. जंजाळ सर, डॉ. झलवार साहेब, शिवराम साखळे, सुनील वाघचौरे, निलेश अवकाळे, देविदास जंजाळ, नंदकुमार दुसाद, जगदीश मोटवानी, रामदास वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. बी. साळवे यांच्यासह बँकेचे कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समता सैनिक दलातील "मेजर" पद मिळाल्याबद्दल आनंदजी जोंधळे यांचा जाहीर सत्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-प्रकाश गवारे** : दि. 21 मे 2026 रोजी भारतीय बौद्ध महासभा शहर उपाध्यक्ष आदरणीय आनंदजी जोंधळे साहेब यांचा समता सैनिक दलातील "मेजर" हे मानाचे पद प्राप्त झाल्याबद्दल जाहीर सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



आनंदजी जोंधळे साहेब यांनी तब्बल ४० वर्षे पोलीस विभागात प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा बजावत पोलीस उपनिरीक्षक (PSI) हे मानाचे पद भूषवले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी समाजकार्याची परंपरा कायम ठेवत समता सैनिक दलामध्ये सक्रिय सहभाग घेत सामाजिक कार्य सुरू ठेवले आहे.त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत समता सैनिक दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना "मेजर" हे पद बहाल केले. त्यांच्या या यशामुळे समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

तसेच या कार्यक्रमामध्ये भारतीय बौद्ध महासभेचे उत्तर विभाग सचिव आदरणीय सदाशिव हानवते साहेब यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, धार्मिक व संघटनात्मक कार्याचा उपस्थित मान्यवरांनी गौरव केला.

या कार्यक्रमास सेवानिवृत्त न्यायाधीश यशवंतजी चावरे साहेब, भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष उत्तर गणपतजी गायकवाड साहेब, उपाध्यक्ष तथा जनरल मेजर सुरेश गजभारे साहेब, सा. ना. भालेराव साहेब, ईश्वर जोंधळे साहेब, सुरेशजी कोकरे साहेब, लोकडे साहेब, विजय दादा पोपुलवार तसेच एस. एन. हनुमंते आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करत सर्व मान्यवरांना पुढील सामाजिक, धार्मिक व मानवतावादी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शेतवस्त्यांचा 'टू-फेज' वीजपुरवठा पूर्ववत करा!

**गोळेगाव उपकेंद्रातील समस्येप्रकरणी पं. स. सदस्य गजानन जाधव यांचा आंदोलनाचा इशारा**

**हिंस्र प्राण्यांचा वावर वाढला!**

**सध्या रात्रीच्या वेळी जंगलातील हिंस्र प्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतकरी कुटुंबासह व पशुधनासह शेतातच वास्तव्यास असल्याने शेतवस्त्यांवर रात्रीचा वीजपुरवठा नियमित सुरू असणे अत्यंत गरजेचे आहे, याकडे निवेदनातून महावितरणचे लक्ष वेधण्यात आले.**

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव उपकेंद्रांतर्गत शेतवस्त्यांवरील पूर्ववत 'टू-फेज' वीजपुरवठा पूर्वीप्रमाणे नियमित सुरू करावा, अशी मागणी पंचायत समिती सदस्य गजानन जाधव यांनी महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

याबाबत महावितरणला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गोळेगाव उपकेंद्रांतर्गत गोळेगाव, उंडणगाव, लिहाखेडीसह अन्य गावांतील शेतवस्त्यांवर पूर्वी नियमित टू-फेज वीजपुरवठा सुरू होता. परंतु, काही महिन्यांपूर्वी स्वतंत्र गावांसाठी सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहेत . त्यामुळे शेतातील टू-फेज वीजपुरवठा रात्रीच्या वेळी खंडित केला जातो. जेव्हा थ्री-फेज वीज असते, तेव्हाच फक्त शेतात वीजपुरवठा उपलब्ध होतो.

आपला देश शेतीप्रधान असून शेतीसोबतच शेळी-मेंढी, गाय, म्हैस, बैल अशी जनावरे शेतकरी पाळतो. वाढती लोकसंख्या आणि गावातील अपुऱ्या निवाशामुळे शेतकऱ्यांनी आपली जनावरे शेतात निवारा बांधून ठेवणे पसंत केले आहे. त्यामुळे अनेक शेतकरी पशुसंवर्धन करण्यासाठी कुटुंबासह शेतात राहतात, तर काही शेतकरी कुटुंबातील किमान एक सदस्य तरी रात्री शेतवस्तीवर मुक्कामी असतो. शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी गोळेगाव उपकेंद्रांतर्गत गावातील शेतवस्त्यांवर टू-फेज वीजपुरवठा पूर्वीप्रमाणे सुरू ठेवावा; अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गजानन जाधव यांनी दिला आहे.

# सोयगाव तालुक्यासाठी जळगाव येथून खत पुरवठ्यास मुख्यमंत्री यांची मान्यता

**आमदार अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश**

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात खताची टंचाई भासू नये तसेच संतुलित खताचा वेळेत आणि सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी सिल्लोड–सोयगाव मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले आहे. राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठकीत सोयगाव तालुक्यासाठी जळगाव येथून खत पुरवठा करण्याची मागणी शासनाने मान्य केली असून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना छत्रपती संभाजीनगर येथून पुरवठा होत



असे त्यामुळे दरवर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला खत उपलब्धतेच्या समस्यांना सामोरे जावे लागते. यामुळे पेरणी आणि पीक व्यवस्थापनावर परिणाम होत असल्याची बाब लक्षात घेऊन आमदार अब्दुल सत्तार यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तसेच कृषी आयुक्तांकडे वारंवार पाठपुरावा केला होता. या मागणीची गंभीर दखल घेत विभागीय आयुक्तांनी राज्यस्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक 2026 मध्ये ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

या बैठकीत मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची गरज लक्षात घेत जळगाव येथून खत पुरवठा करण्यास तत्वतः मान्यता दर्शवली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यामुळे आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या निर्णयामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांनी आमदार अब्दुल सत्तार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे स्वागत करत त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नांतून आष्टी तालुक्याला मिळणार १०८ रुग्णवाहिका

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे** : माननीय ओमप्रकाश शेटे साहेब, अध्यक्ष, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दिनांक 22 मे 2026 रोजी दुपारी दोन वाजता पंचायत समिती येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक समीर शेख यांनी गोरगरीब उसतोड, मजूर,शेतकरी कुटुंबातील ,मुलींना प्रसूतीसाठी दवाखान्यात नेण्यासाठी आणि अपघातग्रस्तांना त्वरित मदत पोहोचवण्यासाठी तालुक्यात एक अतिरिक्त 108 रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

सध्या आष्टी तालुक्यात फक्त एकच 108 ॲम्ब्युलन्स उपलब्ध असल्याने अनेकदा रुग्णवाहिकेच्या प्रतीक्षेत राहून जीवितहानीची शक्यता निर्माण होत असल्याचे समीर शेख यांनी स्पष्ट केले. समीर शेख यांनी आतापर्यंत 48 अपघातग्रस्तांना मदत व 15 गरीब शेतकऱ्यांच्या मुलींना प्रसूतीसाठी मदत केली असली तरी एकच रुग्णवाहिका उपलब्ध असल्याने प्रशासनाला मोठा अडथळा निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



पुढे बोलताना समीर शेख म्हणाले की, आ. सुरेश धस यांच्याकडे ही मागणी बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित होती. काल झालेल्या पत्रकार परिषदेत आ. धस यांनी व मा. ओमप्रकाश शेटे यांनी आमची विनंती मान्य करून तात्काळ ही रुग्णवाहिका मंजूर करण्याचे आश्वासन दिले. विशेष म्हणजे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचा 22 जुलै तारखेला वाढदिवस आहे, त्यापूर्वी ही रुग्णवाहिका मंजूर करून देण्याचे त्यांनी सांगितले.

- आष्टी तालुक्यात अतिरिक्त 108 रुग्णवाहिकेची मागणी
- ओमप्रकाश शेटे यांनी लवकरात लवकर मंजुरीचे आश्वासन दिले
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या 22 जुलै वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्याला 108 ुग्णवाहिकेच्या रूपात गिफ्ट

समाजसेवक समीर शेख यांच्या मागणीला यश

समीर शेख यांनी पुढे सांगितले की, आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नातून तालुक्यातील गोरगरीब जनतेचा हा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल. 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' असा संदेश देत त्यांनी ही मागणी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

आपत्कालीन परिस्थितीत प्रथम 108 वर कॉल करावा रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यास समाजसेवक समीर शेख यांचा मो.7350153708 या नंबरवर कॉल करा आ. सुरेश (आण्णा) धस यांच्या माध्यमातून तात्काळ मदत मिळेल. असे आव्हान समीर शेख यांनी केले आहे.

# शिबिरातून दिशा आणि संधी; चौलच्या विद्यार्थ्यांना मिळाली भविष्याची स्पष्टता; शिबिरातून नवउद्योजकतेकडे पाऊल

## करिअर निवड, कौशल्य विकास व प्रवेशप्रक्रियेवर मार्गदर्शन; दोन विद्यार्थ्यांना नोकरीची खात्री देत जॉइनिंग लेटर सादर

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : चौल येथे दिलीप (छोटमशेठ) विठ्ठल भोईर चॅरिटेबल ट्रस्ट, झिराड आणि उत्कर्ष फाउंडेशन यांनी संयुक्त विद्यमाने बेलोशी व चौल विभागातील इयत्ता १० वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या करिअर मार्गदर्शन शिबिराने स्थानिक शाळा-परिवारांत उत्साहाची लाट निर्माण केली. शिबिराला रायगड जिल्हा परिषद सदस्य श्री. सचिन राऊळ, अलिबाग पंचायत समिती सदस्य श्रीयुत शरद गोंधळी, श्री. संतोष निगडे आणि सौ. अंकिता घरत यांसह अनेक मान्यवरांनी हजर राहून कार्यक्रमाचा गौरव वाढविला.



शिबिरात रामराज, बेलोशी, नागाव, रेवदंडा, कावीर आणि खानाव येथील मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. कार्यक्रमात करिअर निवडण्याच्या योग्य पद्धती, विविध शिक्षण-विकल्प, व्यावसायिक कोर्सेस व कौशल्यावर आधारित नोकऱ्यांच्या संधी याबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना स्वारस्य, क्षमता आणि भविष्यातील रोजगार बाजाराचा विचार करून अभ्यासक्रम निवडण्याचे प्रभावी सल्ले दिले. तसेच अर्ज, प्रवेशप्रक्रिया, कौशल्य विकास आणि मुलाखतीच्या तंत्रांवर प्रत्यक्ष उदाहरणांसह टिप्स दिल्या गेल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास अधिक दृढ झाले.

उत्कर्ष फाउंडेशनच्या माध्यमातून आधीच यशस्वीपणे नोकरी मिळवलेल्या दोन विद्यार्थ्यांना या वेळी आनंदाने जॉइनिंग लेटर प्रदान करण्यात आले. हा क्षण शिबिरातील महत्वाचा आणि प्रेरणादायी भाग ठरला; उपस्थितांच्या चेहऱ्यांवर अभिमान आणि उत्साह दिसून आला. जॉइनिंग लेटर प्राप्त विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांनीही संघटनांचे विशेष आभार मानले.

शिबिराच्या आयोजनामुळे केवळ करिअरबद्दल माहिती मिळाल्यापुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मनोधैर्य आणि स्पष्ट दिशा प्राप्त झाली. अनेक विद्यार्थ्यांनी कार्यक्रमानंतर आपले संशय-प्रश्न विचारले आणि वैयक्तिक मार्गदर्शनासाठी सल्लागारांकडे नोंदणी केली. आयोजकांनी भविष्यातील भूमिकांकरिता अतिरिक्त वर्कशॉप्स आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणांचे आश्वासन दिले आहे.

आयोजकांचे म्हणणे— "योग्य मार्गदर्शन व योग्य शिक्षण हेच उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे. स्थानिक पातळीवर अशा उपक्रमांनीच निकाल लागत आहेत आणि तरुण पिढीच्या स्वप्नांना पंख देत आहेत."

# कोटनांद्रा येथील ३२ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : अज्ञात कारणाने तालुक्यातील कोटनांद्रा येथील ३२ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



संदिप कैलास काकडे या युवकाने शुक्रवार (दि. २२) रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास अज्ञात कारणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यास त्याचे नातेवाईक फकीरराव महादू सोमासे यांनी सिल्लोडच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. या घटनेची सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून, घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल विष्णू कोल्हे हे करीत आहेत.

# श्री राहुल खाडे हे असतील नवी मुंबई पोलीस वाहतूक विभागाचे उपायुक्त



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** जालन्यात अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना, सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या अंतरवाली सराटी (अंबड तालुका) येथील मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्या पोलिस प्रशासकीय प्रक्रियेचा भाग म्हणून घटनेनंतर त्यांच्या सेवेचा सखोल आढावा घेऊन शासनाने त्यांची पुन्हा नियुक्ती केली. मुंबई येथील अन्न आणि औषध प्रशासन येथे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना, एक कार्य तत्पर अधिकारी म्हणून नवी मुंबई पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे यांच्या रचनेनुसार श्री.राहुल खाडे यांची वाहतूक पोलीस उपायुक्त पदी नेमणूक करण्यात आली आहे नवी मुंबई , उलवे, द्रोणागिरी उरण अशा नव्याने विकसित होणाऱ्या ग्रामीण भागाचे शहरीकरण होत असताना तसेच जेएनपीटी द्रोणागिरी वेअर हाऊसिंग परिसरातील अवजड कंटेनर वाहतुकीच्या समस्यांना उत्तम प्रकारे हाताळत आपल्या कार्याचा ठसा उमटवतील अशी जनतेची भावना आहे.

# रिसोड येथे जागतिक चहा दिवसाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर :** आजच्या आधूनिक युगातील लोकांनी मान्य केलेले महत्वाचे पेय म्हणजे चहा होय. मे महिन्या मध्ये चहाचे उत्पादन सर्वाधिक होते म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर 21 मे हा जागतिक चहा दिन म्हणून घोषित केल्या गेला. आप्तस्वकियांमधील प्रेम द्विगुणीत करण्याकरीता चहा महत्वपुर्ण भुमिका बजावतो हे तेवढेच खरे.त्यामूळे कमी साखर व मर्यादित स्वरूपात सेवन केलेला चहा मानसिक दृष्ट्या हितकारक आहे असे म्हणने वावगे होणार नाही,असे मत पर्यावरण





प्रेमी गजानन मुलंगे ह्यांनी स्वतःच्या घरी आयोजित केलेल्या 'जागतिक चहा दिन' कार्यक्रमादरम्यान व्यक्त केले.कार्यक्रमाकरीता विजय देशपांडे नायब तहसिलदार रिसोड,मयूर नकवाल,स्वप्निल इरतकर,सागर डांगे सदस्य नगर परिषद रिसोड,शरद टेमधरे प्राचार्य श्री शिवाजी विद्यालय मोप प्रामुख्याने उपस्थित होते. एकत्रित चहा घेतांना अनेक समस्यांच निराकरण जरी होत असलं तरी आपण चहा स्थलांतरीत करतांना प्लॅस्टिक पिशवी तसेच चहा पितांना कागदी कपांचा वापर करून दुर्धर आजारांना निमंत्रण देत एक नव्हे,तर अनेक नविन समस्या निर्माण करत आहोत हे कितपत योग्य आहे?कागदी कपाला कडक व टिकाऊपणा आणण्याकरिता बीपीए अर्थात बिस्फेनॉल- ए नामक रसायनांचा उपयोग केला जातो.सदर्हु कपामध्ये गरम चहा ओतल्यास त्यामध्ये बीपीए रसायन विरघळून चहा सोबत शरीरामध्ये शिरकाव करते आणि कळत-नकळत आपण कर्करोगासारख्या आजाराला बळी पडतो,ह्यात तिळमात्र शंका नाही.या शिवाय वापरून भिरकावलेल्या चिकट कागदी कपामुळे जागोजागी निर्माण होणार्या दुर्गंधीयुक्त ढीगाकडे दुर्लक्ष करून कसे भागणार ? चहा घ्या!पण चिनी मातीच्या किंवा काचेच्या कपामध्येचं घ्या असा विनंतीवजा आग्रह ह्यावेळी उपस्थितांना करण्यात आला.आमचं ठरलं!आपणही ठरवा आणि रोगमुक्त व भयमुक्त जीवन जगा असा मोलाचा सल्ला देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता मदन चौधरी,श्रावणी बरडे,दिया बरडे, कावेरी मुलंगे,लक्ष्मी मुलंगे माधवी मुलंगे,अरुणा थोरात,मंदा थोरात,नंदा गांजरे इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुणवंत थोरात तर आभार राजेश्वर मुलंगे ह्यांनी मानले.

# जनतेच्या समस्या थेट पालकमंत्र्यांच्या लॅपटॉपवर; दिग्रस मतदारसंघाचा 'डिजिटल' कारभार!

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर :** आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या, तक्रारी आणि मागण्या सुटसुटीतपणे व वेळेत मार्गी लागाव्या यासाठी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सुरू केलेली 'डिजिटल दिग्रस' ही ऑनलाईन व्यवस्था नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. दिग्रस येथील जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सुरू असलेल्या या ऑनलाईन नोंदणी पद्धतीमुळे कामात कमालीची पारदर्शकता आली असून, नागरिकांना थेट पालकमंत्र्यांपर्यंत आपली गाऱ्हाणी पोहोचवणे सोपे झाले आहे.



**"मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला वैयक्तिकरीत्या रोज भेटणे वेळेअभावी नेहमीच शक्य होत नाही. म्हणूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही हक्काची डिजिटल व्यवस्था निर्माण केली आहे. नागरिकांनी आपल्या वैयक्तिक किंवा सामाजिक समस्यांसाठी, तसेच शासकीय योजनांच्या अडचणींसाठी दिग्रस कार्यालयाशी हक्काने संपर्क साधावा."**

**— संजयभाऊ राठोड (मंत्री, मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री, यवतमाळ)**

मतदारसंघातील जनतेशी थेट नाळ जोडून ठेवणाऱ्या या आधुनिक कार्यपद्धतीची माहिती नागरिकांपर्यंत सतत पोहोचणे गरजेचे आहे, जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना आपल्या प्रलंबित कामांसाठी याचा वापर करता येईल.दिग्रस कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे निवेदन आणि माहिती तिथले प्रतिनिधी एका विशेष 'ॲप'मध्ये अपलोड करतात. यामध्ये तक्रारदाराचा फोटो आणि निवेदनाची प्रत डिजिटल प्रणालीत नोंदवली जाते.निवेदन नोंदवल्यानंतर नागरिकांना एक अधिकृत तक्रार क्रमांक दिला जातो. या क्रमांकाच्या आधारे नागरिकांना आपल्या अर्जाचा पुढील पाठपुरावा घरबसल्या ट्रॅक करता येतो.

या तंत्रज्ञानामुळे पालकमंत्री संजय राठोड हे दौऱ्यावर किंवा मंत्रालयात कुठेही असले, तरी त्यांना दिग्रस कार्यालयात आलेल्या तक्रारी आणि निवेदने थेट आपल्या लॅपटॉपवर पाहता येतात व त्यावर ते तात्काळ आवश्यक निर्णय घेऊ शकतात. सुरुवातीला तालुकास्तरीय प्रतिनिधींमार्फत स्थानिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. गरज पडल्यास जिल्हा कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी व स्वीय सहाय्यक यामध्ये मदत करतात. मात्र, तालुका किंवा जिल्हा पातळीवर न सुटणाऱ्या क्लिष्ट किंवा गंभीर प्रकरणांमध्ये स्वतः पालकमंत्री संजय राठोड, संबंधित शासकीय अधिकारी आणि तक्रारदार यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न तातडीने निकाली काढला जातो.या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, तक्रारीचे निवारण झाल्यानंतर नागरिक समाधानी आहेत की नाही याची खात्री करण्यासाठी मुंबई कार्यालयातील प्रतिनिधी थेट दूरध्वनीद्वारे (फोन करून) संपर्क साधतात. नागरिकांचे संपूर्ण समाधान झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच ती तक्रार प्रणालीमध्ये 'बंद' केली जाते.

# शिक्षक भरती, जुनी पेन्शनसह विविध मागण्यांसाठी प्रोटॉन शिक्षक संघटनेनी दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर :** राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ प्रणीत प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (PROTAN) संघटनेमार्फत राज्यातील विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज २२ मे २०२६ रोजी तहसीलदार दिग्रस यांना निवेदन देण्यात आले असून, ५ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेने दिली आहे.



संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संवैधानिक हक्कांसाठी तसेच विविध शैक्षणिक प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, यासाठी हे आंदोलन करण्यात आले आहे. सरकारने शिक्षक भरती, कर्मचारी कपात, कंत्राटी पद्धती, जुनी पेन्शन योजना, समान वेतन, रिक्त पदे भरणे, अतिरिक्त कामांचा ताण तसेच अन्य प्रशासकीय अडचणी यांसारख्या मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या मते, अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी न्यायालयीन प्रक्रियेमुळे तसेच शासनाच्या विलंबामुळे आर्थिक व मानसिक अडचणीत सापडले आहेत. अनेक प्रकरणांमध्ये न्याय मिळण्यात उशीर होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर संघटनेने २२ मे रोजी तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचा निर्णय घेतला होता तो राज्यभर निवेदन देन्यात आले त्यानंतर ५ जून रोजी राज्यभर जिल्हास्तरीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

तसेच पाच जुलै 2026 रोजी पुणे येथे राज्यस्तरीय विशाल रॅली सथा दुसरी शिक्षण परिषद घेण्यात येणार आहे. आंदोलनात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अंगणवाडी सेविका, शिक्षण सेवक, विषयतज्ज्ञ, सीएचबी तत्त्वावरील प्राध्यापक आदी सहभागी होणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित कर्मचारी व नागरिकांनी आंदोलनात सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

प्रोटॉन यूनिट दिग्रस यांच्या वतीने तहसीलदार मयुर राऊत यांना निवेदन देन्यात आले या वेळी प्रोटॉन चे तालुका अध्यक्ष जयपाल सोनोने, RMBKS विभागीय कार्याध्यक्ष प्रदीप चोपड़े,RMBKS जिल्हा अध्यक्ष दिलीप जवादे, गजानन सातपुते,बुद्धिवंता खाडे,पांडुरंग बळी,रामेश्वर पेंदोर,अनिल अंबुरे,गोविंदा पारधी, दत्ता खेकाळे,गजानन गंडाळे,परमेश्वर व्यवहारे,सुनील डोलारकर इत्यादि कार्यकर्ते उपस्थित होते

# पारो'च्या स्मृतीदिनानिमित्त अजिंठ्यात इतिहासप्रेमींकडून अभिवादन



**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठाच्या ऐतिहासिक वैभवाचा एक भाग असलेल्या स्थानिक आदिवासी कन्या 'पारो'च्या स्मृतीदिनानिमित्त शनिवारी (दि. २३) स्थानिक इतिहासप्रेमींच्या वतीने सकाळी ११ वाजता अजिंठा येथील समाधीस्थळी जाऊन विनम्र अभिवादन करण्यात आले.

अजिंठा लेणीच्या संवर्धनासाठी ब्रिटिश कालखंडात नियुक्त केलेले अधिकारी मेजर रॉबर्ट गिल आणि स्थानिक आदिवासी कन्या पारो यांची देश, भाषा, धर्म आणि प्रांत या सर्व सीमा ओलांडणारी ऐतिहासिक प्रेम कहाणी प्रसिद्ध आहे. पारोच्या निधनानंतर तिच्याविषयी कृतज्ञता व आदर व्यक्त करण्यासाठी मेजर रॉबर्ट गिल यांनी २३ मे १८५६ रोजी अजिंठा पोलीस ठाण्याच्या आवारात तिची कबर (समाधी) बांधली होती. या ऐतिहासिक वारशाचे स्मरण म्हणून दरवर्षी २३ मे रोजी इतिहासप्रेमी येथे अभिवादनासाठी एकत्र येतात.

या निमित्ताने आयोजित छोटेखानी कार्यक्रमात स्थानिक इतिहास संशोधक विजय पगारे, अजिंठा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे, निवृत्त सहायक पोलीस उपनिरीक्षक विकास चौधरी, निवृत्त केंद्रप्रमुख अण्णा पोळ, पत्रकार अरुण चव्हाण-देशमुख, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय संघटक पत्रकार संजय जाधव, पत्रकार मुनीर पठाण आणि संतोष वाघ यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी समाधीस्थळावर पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

# आर.एस. तिडके स्कूल ऑफ स्कॉलर्स, येवदा येथील विद्यार्थ्यांची दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यशाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी :**श्री संत परशराम महाराज क्रीडा शिक्षण बहुउद्देशीय संस्था संचालित लेट रामकृष्ण एस. तिडके स्कूल ऑफ स्कॉलर्स, येवदा या शाळेने मार्च २०२६ मध्ये झालेल्या एस.एस. सी. बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा उज्ज्वल यश संपादन केले आहे. शाळेने सलग चौथ्या वर्षी १००% निकालाची परंपरा कायम राखत तालुक्यात आपला दबदबा सिद्ध केला आहे.

शाळेची विद्यार्थिनी कु. पूजा सुनिल भुते हिने ९५.६०% गुण मिळवून घवघवीत यश मिळवले आहे. फुल इंग्लिश मीडियममधून शिक्षण घेणाऱ्या पूजाने संपूर्ण तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षक व पालकांनी तिचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

पूजासोबतच शाळेतील इतर २० विद्यार्थ्यांनीही विशेष प्रावीण्यासह यश मिळवले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांची





यादी पुढीलप्रमाणे:

**- ९०% पेक्षा जास्त :** भक्ती जायभाये ९२.००%, तनुश्री हिवसे ९०.६०%, आचल अथिलकर ९०.२०%, ईश्वरी गावंडे ९०.००%

**-८०% पेक्षा जास्त:** गायत्री बुरुडे ८७.८०%, संकल्प शिंगणजुळे ८४.८०%, प्रियेश सिरसाट ८३.२०%, हरिओम मानकर ८१.६०%, तन्वी काळने ८१.४०%, श्रावणी वाघमारे ८१.४०%, कृष्णा वाकोडे ८०.४०%

**इतर यशस्वी विद्यार्थी :** दिप जाणे ७७.२०%, नैतिक कोरपे ७७.२०%, अर्पित सदार ७६.४०%, अर्थव नागे ७६.४०%, राज वाकोडे ७५.६०%, श्रावणी भोयर ७४.४०%, आयुष हिवसे ७४.२०%, वैष्णवी गावंडे ७२.२०%, अर्थव डोरस ७०.४०%या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. "शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच सलग ४ थे वर्ष १००% निकाल लागला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्लिश मीडियम शिक्षण देण्याचा आमचा संकल्प आहे," अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापकांनी दिली.

शाळेत नर्सरी, केजी-१, केजी-२ व इयत्ता १ ली ते १० वी करिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अधिक माहितीसाठी पालकांनी ९०२१४७२८८३, ७४१०७१८१५०, ९७६७९८२६९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

***शुभेच्छुक*:** अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद, आर.एस. तिडके स्कूल, येवदा.

# प्रमोद शेवाळे 'नवी मुंबई' चे अपर पोलीस आयुक्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** राज्याच्या गृह विभागाने पोलीस प्रशासनात केलेल्या मोठ्या फेरबदलानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात मोठा खांदेपालट झाला आहे. शहरात नव्याने दाखल झालेल्या पाचही पोलीस उपायुक्तांच्या नियुक्त्यांचे आदेश पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी जारी केले आहेत. यामध्ये परिमंडळ-1, 3, वाहतूक शाखा आणि विशेष शाखा यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विभागांचा समावेश असून, या बदल्यांमुळे शहराच्या कायदा-सुव्यवस्थेला नवीन दिशा देण्यासाठी पोलीस आयुक्तांनी आपल्या नव्या टीमसोबत कंबर कसली आहे.

नवी मुंबईत रुजू झालेल्या पाचही उपायुक्तांना त्यांच्या पूर्वानुभवाचा विचार करुन पोलीस आयुक्तांनी महत्त्वाच्या विभागांचे वाटप केले आहे. पोलीस उपायुक्त विजय खरात यांच्यावर परिमंडळ-1ची तर पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्यावर परिमंडळ-3ची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यासोबतच पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांच्याकडे वाहतूक विभाग, पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांच्याकडे मुख्यालय तर पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांच्याकडे विशेष शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून रिक्त असलेल्या अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) या अत्यंत महत्त्वाच्या पदाचा सस्पेन्स अखेर संपला आहे. राज्याच्या गृह विभागाने पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी) श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या असून, यात प्रमोद शेवाळे यांची दहशतवाद विरोधी पथकातून (एटीएस) थेट 'नवी मुंबई'चे नवे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या पदावर वर्णी लागावी यासाठी राज्यातील अनेक वरिष्ठ पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरु होती. मंत्रालयातून मोठ्या प्रमाणावर राजकीय वशिलेबाजी आणि दबावाचा वापर केला जात असल्यामुळे, गुन्हे शाखेचा सदर महत्त्वपूर्ण कारभार कोणाच्या हातात जातो, याची उत्सुकता संपूर्ण पोलिस दलाला लागली होती. अखेर गृह विभागाने प्रमोद शेवाळे यांची त्या पदावर नियुक्ती करुन सर्व चर्चाना पूर्णविराम दिल्याचे बोलले जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सहकार महर्षी कै . माणिकराव पालोदकर यांना पालोद येथे विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सहकार आणि महसूल क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल 'सहकार महर्षी' म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री कै. माणिकराव पालोदकर यांच्या पावन स्मृतीस पालोद येथे विनम्र अभिवादन करण्यात आले. पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

कै.माणिकराव पालोदकर यांनी आपल्या कार्यकाळात माणिकनगर येथे 'सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्या'ची स्थापना करून ग्रामीण भागात रोजगाराचे मोठे जाळे निर्माण केले होते. याशिवाय विविध शैक्षणिक संस्था, सहकारी बँका, पतसंस्था, वस्त्रोद्योग आणि खेळणा प्रकल्पाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली व

परिसराचा कायापालट केला. त्यांच्या याच लोककल्याणकारी व दूरदृष्टीच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख यावेळी उपस्थितांनी केला. महाविद्यालयात प्राचार्य प्रदीप कानडजे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी दिलीप जाधव, प्रा. योगेश निंभोरे, कृष्णा भंडारे, सुनील तांबे, राजेश ठोंबरे, कृष्णा पाटील, सुनील सागरे, भास्कर केरले, जयश्री चापे, प्रफुल कळम, गजानन सपकाळ, संजय जाधव, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**'पालोद विविध कार्यकारी सेवा सह. सोसायटी'त स्मृतींना उजाळा**

**पालोद येथील 'पालोद विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.' मध्येही कै. माणिकराव पालोदकर यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सोसायटीचे पदाधिकारी, संचालक आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत कै.माणिकराव पालोदकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. सर्वसामान्यांच्या मनातील आदरस्थान असलेल्या या लोकनेत्याला उपस्थितांनी भावपूर्ण आदरांजली वाहिली.**

# आदिवासी बांधवांसाठी शासनाचे 'महाशिबीर'

## धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत जेठभावडा येथे विविध योजनांचा लाभ

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रवाहापासून वंचित असलेल्या आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आदिवासी बांधवांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचे एकत्रीकरण करून 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' सुरू करण्यात आले असून, याअंतर्गत देवरी तालुक्यातील जेठभावडा येथे नुकतेच एका भव्य जनभागीदारी महाशिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या विशेष अभियानांतर्गत प्रामुख्याने आदिवासीबहुल गावांवर लक्ष केंद्रित करून त्यांना वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या सोयी-सुविधा तत्परतेने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. प्रशासनाची गावोगावी धडक

गतवर्षी १५ जून ते १५ जुलै दरम्यान राबविण्यात आलेल्या यशस्वी कॅम्पच्या धर्तीवर, यंदा १८ मे ते २५ मे या कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील निवडक गावांमध्ये 'जनभागीदारी अभियान' राबविण्यात येत आहे. याच शृंखलेत आज देवरी तालुक्यातील सिंधीबिरी व जेठभावडा या गावांतील नागरिकांसाठी ग्रामपंचायत कार्यालय, जेठभावडा येथे एका विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले.




**एकाच छताखाली विविध शासकीय सुविधा**

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामस्थांना विविध शासकीय कामांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांच्या चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी अनेक प्रशासकीय विभाग एकाच छताखाली एकत्र आले होते. यामध्ये महसूल, आरोग्य, कृषी, महिला व बालविकास आणि आदिवासी विकास विभागाच्या यंत्रणांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

**शिबिरात नागरिकांना देण्यात आलेल्या प्रमुख सेवा:**

आधार कार्ड नोंदणी व अद्ययावतीकरण

आयुष्मान भारत कार्डचे वितरण

सिकलसेल आणि क्षयरोग (TB) तपासणी शिबिर

जात प्रमाणपत्र व अधिवास (Domicile) प्रमाणपत्र काढण्याची सुविधा

रेशन कार्ड अद्ययावतीकरण आणि इतर तत्सम महत्त्वाचे शासकीय दस्तऐवज

आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या योजनांचा लाभ थेट त्यांच्या दारी मिळवून देण्यासाठी महसूल विभाग, आदिवासी विकास विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग आणि कृषी विभाग यांच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

सर्व विभागांच्या या संयुक्त प्रयत्नांमुळे व उत्कृष्ट समन्वयामुळे हे महाशिबीर अत्यंत यशस्वी ठरले असून, परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाला उदंड प्रतिसाद दिला आहे.

**"आदिवासी बांधवांना योजनांच्या लाभासाठी सरकारी कार्यालयात जावे लागू नये, हाच या जनभागीदारी अभियानाचा मुख्य उद्देश आहे. 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियाना'च्या माध्यमातून शासन आणि प्रशासन थेट दुर्गम भागातील जनतेच्या दारी पोहोचत आहे. तळागाळातील प्रत्येक लाभार्थ्याला त्याच्या हक्काच्या योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी आमची संपूर्ण यंत्रणा कटिबद्ध आहे."**

**डॉ. मंगेश गोंदावले, जिल्हाधिकारी, गोंदिया.**

# तब्बल हरविलेले 40 लाख रुपये किंमतीचे 130 मोबाईल फोन गुन्हे शाखा कक्ष 3 पनवेलने केले नागरिकांना परत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : नवी मुंबई आयुक्तालय हद्दीतील तब्बल हरविलेले 40 लाख रुपये किंमतीचे 130 मोबाईल फोन गुन्हे शाखा कक्ष 3 पनवेलने आज नागरिकांना विशेष कार्यक्रमात परत केले आहेत.

पनवेल येथे असलेल्या गुन्हे शाखा कक्ष 3 कार्यालयात सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) श्रीमती प्रेरणा कट्टे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष 3, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अविनाश काळदाते यांच्या विशेष पथकाने आज हे मोबाईल परत केले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हदित मोठयाप्रमाणावर लोकवस्ती असल्याने येथे वास्तवव्यास असलेले तसेच कामानिमित्ताने आलेल्या लोकांचे प्रवासादरम्यान, खरेदीच्या वेळी तसेच इतर अनेक कारणास्तव त्यांचेकडील वापरते मोबाईल फोन गहाळ झाल्याबाबत पोलीस ठाण्यांकडे मोठ्याप्रमाणावर प्रॉपर्टी मिसींग दाखल होत आहेत. अशा



प्रकारे गहाळ झालेल्या मोबाईल फोन बरोबर फोन धारकाचे नातेवाईक, मित्र व परिचित इसमांचे संपर्क क्रमांक, फोटो, व्हिडीओ, महत्वाचा डाटा, मेसेज इत्यादी स्वरूपाने त्यांच्या आठवणी त्यात जतन केलेल्या असल्याने व असे गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळुन येत नसल्याने मोबाईल गहाळ होणे हा संबंधीत मोबाईल धारकांचा भावनिक विषय बनला जातो.

मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण लक्षात घेता गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्याकरीता शासन स्तरावर सीईआयआरपोर्टल कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांनी सीईआयआर. पोर्टलचा वापर करुन गहाळ झालेले मोबाईल फोन परत मिळविण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले होते.

त्यानुसार सदरची उल्लेखनीय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष 3 पनवेलचे वपोनि अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वाखाली सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ अनिल पाटील, रमेश शिंदे, पोहवा प्रशांत काटकर, प्रमोद राजपूत, निलेश पाटील, दिपक डोंगरे, सागर रसाळ, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, अजित पाटील, हिरकणी पाटील, पो.ना.आजिनाथ फुंडे, विनया पाटील, पो.शि.लवंकुश शिंगाडे, विक्रांत माळी, प्रसाद घरत आदींच्या पथकाने पोलीस ठाणे स्तरावर सीईआयआरपोर्टल वर गहाळ झालेल्या मोबाईल फोनची तसेच संबंधीत फोन धारकाची आवश्यक ती माहिती भरल्यानंतर सदर हरवलेल्या मोबाईलचा शोध हा पोहवा इंद्रजित कानु, गुन्हे शाखा कक्ष 3, पनवेल यांचेकडुन देखिल समांतर शोध सुरू करून त्यांनी गुन्हे शाखा कक्ष 3 पनवेल यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हदितील गहाळ झालेल्या मोबाईल फोन पैकी मागील तीन महिन्यात महाराष्ट्र राज्यातील तसेच परराज्यातील अंदाजे 39,75,000/-रुपये किंमतीचे विविध कंपन्यांचे एकुण 130 मोबाईल फोन परत मागवून ते संबंधीत मोबाईल धारकांना परत देवुन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

# जळकोट तहसील प्रशासनाविरोधात राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे तक्रार

## संजय गांधी निराधार योजनेच्या लाभापासून वंचित ठेवल्याचा दलित महिलांचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : जिल्हा लातूर येथील तहसील प्रशासनाकडून दलित महिलांना कथितरित्या जातीय भेदभावाची वागणूक देत शासनाच्या ₹२१ हजार उत्पन्नाच्या प्रमाणपत्र दिले नसल्यामुळे 'संजय गांधी निराधार योजने'पासून वंचित ठेवल्याचा गंभीर आरोप आहे. याप्रकरणी तत्कालीन महिला नायब तहसीलदार व संबंधित कर्मचाऱ्यांवर ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात श्रमिक हक्क अभियानचे संचालक ज्ञानेश्वर भाऊ सूर्यवंशी, राहणार देवणी शहर लातूर जिल्हाध्यक्ष दशरथ कांबळे आणि NCDHR संघटनेच्या वतीने १९ मे २०२६ रोजी राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग (मुंबई), जिल्हाधिकारी (लातूर) व उपविभागीय अधिकारी (उदगीर) यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**मुख्य आक्षेप आणि मागण्या**

अडवणुकीचा आरोप

अनुसूचित जातीतील गरजू व घटस्फोटित महिलांनी ऑनलाईन विहित नमुन्यात सक्षम पुरावासह अर्ज करूनही, त्यांना १५ दिवसांत मिळणारे उत्पन्न प्रमाणपत्र ३ ते ४ महिने प्रलंबित ठेवण्यात आले. शेवटी 'आर्थिक वर्ष संपले' असे कारण पुढे करत त्यांचे अर्ज नाकारण्यात आलेली पीडित महिलांची नावे तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे ज्योती गायकवाड रा. पाटोदा बु. काजल अदावळे.भारतबाई आदावळे रा. रावणकोळा. ता.जळकोट येथील महिलांनी श्रमिक संघटनेकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली.

जातीय भेदभाव

केवळ विशिष्ट समाजाच्या असल्यामुळेच महिलांना प्रशासनाने हेतुपुरस्सर त्रास दिला, जो शासन निर्णयाचे उल्लंघन आणि मानसिक छळ आहे, असा आरोप संघटनांनी केला आहे.




प्रमुख मागण्या

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, दोषींवर ॲट्रॉसिटी अंतर्गत कारवाई करून त्यांना निलंबित करावे आणि पीडित महिलांना योजनेचा लाभ त्वरित मिळवून द्यावा.

**तीव्र आंदोलनाचा इशारा**

दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास जळकोट तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा श्रमिक हक्क अभियान आणि NCDHR ने दिला आहे. या प्रकरणामुळे लातूर जिल्ह्यातील शासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# मान्सूनपूर्व तयारीला वेग आरोग्य विभागाकडून नाली साफसफाई मोहीम युद्धपातळीवर-बढेल!

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी रणजितसिह.ठाकुर** : शहरात येऊ घातलेल्या मान्सूनच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने स्वच्छता आणि नाली साफसफाई मोहिमेला वेग दिला असून, विविध भागांमध्ये प्रत्यक्ष घटनास्थळी रोहित बढेल

स्वच्छता निरीक्षक, व निरीक्षकांकडून नाल्यांची साफसफाई करून घेतली जात आहे. पावसाळ्यात पाणी तुंबणे, दुर्गंधी निर्माण होणे तसेच साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी नगरपरिषदेने ही मोहीम युद्धपातळीवर सुरू केली आहे.मुख्याधिकारी सतीश शेवदा आणि नगराध्यक्ष भगवानराव क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत वसाहती, बाजारपेठ परिसर तसेच सखल भागांतील नाल्यांची साफसफाई करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी गाळ, प्लास्टिक कचरा आणि अडथळे हटवून पाण्याचा निचरा सुरळीत करण्यात आला.

आरोग्य निरीक्षकांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांसह विविध भागांची पाहणी करत नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत तातडीने उपाययोजना केल्या. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी नगरपरिषद प्रशासन सतर्क झाल्याचे चित्र दिसून येत आहे.नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांनाही स्वच्छतेबाबत सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, कचरा नाल्यात टाकू नये, सार्वजनिक ठिकाणी घाण करू नये तसेच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे सांगण्यात आले आहे.मान्सूनपूर्व सुरू असलेल्या या व्यापक स्वच्छता मोहिमेमुळे शहरवासीयांकडून समाधान व्यक्त केले जात असून, नगरपरिषदेच्या या सक्रिय भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात असल्याचे शिवाजी शैलार, संतोष क्षिरसागर, सैय्यद जेमिल सैय्यद बाबा ,यांनी सांगितले असून यासर्व बाबींवर प्रतापराव देशमुख सुद्धा लक्ष केंद्रित करून सर्वतोपरी आपलं कर्तव्य पार पाडत असल्याची माहिती कार्यालयातील खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे.

**(मुख्याधिकारी सतीश शेवदा व नगराध्यक्ष भगवानराव क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहर स्वच्छतेवर भर)**



# जे.एन.पी.ए.मध्ये २८ मेपासून ट्रान्सपोर्टरचा 'चक्काजाम'

## अवाजवी लोलो शुल्काविरोधात 10 संघटनांचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : जेएनपीए येथील एमटी कंटेनर यार्डमध्ये रिकाम्या कंटेनरच्या पिकअप व ड्रॉप-ऑफसाठी आकारल्या जाणाऱ्या अवाजवी लोलो चार्जेस व इतर शुल्कांविरोधात देशातील प्रमुख 10 ट्रान्सपोर्ट संघटनांनी 28मे 2026 पासून स्वेच्छेने सेवा बंद करण्याचा घणाघाती इशारा दिला आहे. यामुळे देशाच्या सर्वात मोठ्या कंटेनर बंदरातील आयात-निर्यात व्यवहार ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे. या संदर्भातील "नोटीस टू ट्रेड" सर्व भागधारकांना जारी करण्यात आली आहे.

सर्व ट्रान्सपोर्ट संघटनांनी वारंवार एमटी कंटेनर यार्डमध्ये रिकाम्या कंटेनरच्या पिकअप व ड्रॉप-ऑफसाठी आकारल्या जाणाऱ्या जास्त शुल्काबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. विविध प्राधिकरणांशी अनेक बैठका व चर्चा होऊनही या प्रश्नावर कोणताही सकारात्मक तोडगा निघालेला नाही आणि परिस्थिती अधिकच बिघडत चालली आहे. या पार्श्वभूमीवर, जेएनपीए येथे कार्यरत सर्व ट्रान्सपोर्ट संघटनांनी एकत्रितपणे निर्णय घेतला आहे की, कोणताही ट्रान्सपोर्टर रिकाम्या कंटेनरच्या पिकअप किंवा ड्रॉप-ऑफसाठी कोणतेही लोलो चार्जेस किंवा एमटी कंटेनर यार्डमधील इतर



कोणतेही शुल्क भरणार नाही. त्यानुसार, 28 मे 2026 पासून ज्या ठिकाणी असे शुल्क मागितले जाईल तेथे सर्व वाहतूक वाहने स्वेच्छेने कामकाज बंद ठेवतील. या परिस्थितीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी ट्रान्सपोर्ट संघटना जबाबदार राहणार नाहीत, असेही नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

ट्रान्सपोर्टरच्या या इशाऱ्यामुळे जेएनपीएवरील ताण आणखी वाढणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून पश्चिम आशियातील भूराजकीय तणावामुळे जेएनपीएमध्ये सुमारे 3000ते 5000 निर्यात कंटेनर अडकून पडले होते. यामुळे कांदा, केळी, द्राक्षे यांसारखा नाशवंत माल व बासमती तांदळाच्या सुमारे 1.5 ते 2 लाख टन निर्यातीवर परिणाम झाला होता. रीफर कंटेनरसाठी दिवसाला सुमारे 8000 रुपये वीज शुल्क लागत असल्याने निर्यातदारांचे कोट्यवधींचे नुकसान होत होते. या पार्श्वभूमीवर जेएनपीए प्रशासनाने 28 फेब्रुवारी ते 14 मार्च 2026 या कालावधीत अडकलेल्या पश्चिम आशियाकडे जाणाऱ्या कंटेनरसाठी15 दिवसांपर्यंत 100% ग्राउंड रेंट व ड्वेल टाईम शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच रीफर कंटेनरसाठी 80% प्लगइन चार्जेस माफ करण्यात आले होते. या सवलतीमुळे निर्यातदारांना प्रति कंटेनर सुमारे 1 लाख रुपयांचा, म्हणजेच एकूण 12 कोटी रुपयांचा दिलासा मिळाला होता.

केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी घेतलेल्या बैठकीनंतर कॉनकॉरने जेएनपीएमध्ये रिकामे कंटेनर 90 दिवसांपर्यंत मोफत ठेवण्यास परवानगी दिली होती. तसेच 90दिवसानंतरचे शुल्क 300 रुपयांवरून 1500 रुपये करण्यात आले. 40फूट कंटेनरसाठी स्टोरेज व हँडलिंग चार्जेस 9000 वरून 2000 रुपये तर 20 फूट कंटेनरसाठी 6000 वरून 1000 रुपये करण्यात आले. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियानेही तातडीने 900 टीईयू क्षमता वाढवण्याची आणि 5 नवीन कंटेनर जहाजे खरेदी करण्याची घोषणा केली होती. मात्र, एमटी यार्डमधील लोलो चार्जेसचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. ट्रान्सपोर्टरच्या मते, जोपर्यंत व्यावहारिक सुधारणा होत नाहीत तोपर्यंत देशाला गंभीर पुरवठा साखळीतील अडथळ्यांना सामोरे जावे लागेल. हे आंदोलन केवळ ट्रान्सपोर्टरच्या अस्तित्वासाठी नसून देशाच्या आर्थिक जीवनवाहिनीच्या सुरळीत हालचालीसाठी आहे, असे ट्रान्सपोर्टर नेत्यांनी म्हटले आहे.

ही नोटीस न्हावा-शेवा कंटेनर ऑपरेटर्स वेल्फेअर असोसिएशन, रीफर कंटेनर ट्रान्सपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशन, ऑल इंडिया ट्रान्सपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र हेवी व्हेईकल अँड इंटरस्टेट कंटेनर ऑपरेटर्स असोसिएशन, लोकल असोसिएशन नवा शेवा, अखिल महाराष्ट्र राज्य मोटर मालक संघ, नवी मुंबई ट्रान्सपोर्ट असोसिएशन, महाराष्ट्र राज्य मोटर मालक संघ, महाराष्ट्र वाहतूक सेना आणि जय भगवान ट्रान्सपोर्ट असोसिएशन यांच्यावतीने जारी करण्यात आली आहे. जेएनपीए हे देशातील सर्वात व्यस्त कंटेनर बंदर असून येथील स्वतःचे टर्मिनल120% पेक्षा जास्त क्षमतेने कार्यरत आहे. अशा स्थितीत ट्रान्सपोर्टरचा संप झाल्यास बंदरातील कोंडी आणखी वाढून आयात-निर्यातदार, व्यापारी, लघु उद्योग आणि शेवटी सामान्य नागरिकांवर त्याचा गंभीर परिणाम होईल. त्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी धोरणकर्त्यांनी तातडीने चर्चा सुरू करावी, अशी मागणी ट्रान्सपोर्ट संघटनांनी केली आहे.

# नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५०४ धोकादायक इमारतींची यादी जाहीर

## वाशी विभागात सर्वाधिक १८३ तर ऐरोली व दिघा येथे सर्वात कमी म्हणजे अनुक्रमे ८ व ९ धोकादायक इमारती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२६-२०२७ या वर्षासाठी विभागवार सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ५०४ इमारती या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये, अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे अशा 'सी-१' प्रवर्गामध्ये मोडणा-या ५२ इमारती तसेच इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ ए' प्रवर्गामध्ये मोडणा-या १०२ इमारती आणि इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२: बी' प्रवर्गामध्ये मोडणा-या २९७ इमारती त्याचप्रमाणे इमारतीची किरकोळ दुरूस्ती या 'सी-३' प्रवर्गामध्ये मोडणा-या ५३ इमारती, अशाप्रकारे एकूण ५०४ धोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात आलेली आहे. ही यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'विभाग' सेक्शनमध्ये 'अतिक्रमण विभाग' माहितीच्या सेक्शनमध्ये 'सामान्य माहिती' या अंतर्गत अवलोकनासाठी सहज उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

यायादीमध्येअतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करण्याच्या 'सी–१ प्रवर्गामध्ये नमूद ५२ इमारतींची नावे व तपशील नागरिकांना सहज कळावा यादृष्टीने ठळक (BOLD) अक्षरात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.




महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार घोषित इमारतींमध्ये वास्तव्य करणारे मालक / भोगवटादार यांना ते राहत असलेली इमारत निवासी / वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत आणि या इमारतींमधील निवासी / वाणिज्य वापर तात्काळ थांबविणेबाबत तसेच धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि. ५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार लेखी सूचना / नोटीस देण्यात आलेल्या आहेत. 'सी-१' प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जलजोडणी खंडीत करण्यात येईल असेही यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

अशा धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मालक अथवा भोगवटादार यांनी ते रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा संभव लक्षात घेऊन सदर इमारतीचा / बांधकामाचा निवासी / वाणिज्य वापर त्वरित बंद करावा आणि सदरची इमारत / बांधकाम विनाविलंब तोडून टाकावे असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यास, सदर इमारत / बांधकाम कोसळल्यास होणा-या नुकसानीस फक्त संबंधित जबाबदार असतील, नवी मुंबई महानगरपालिका यास जबाबदार राहणार नाही असे स्पष्टपणे सूचित करण्यात आलेले आहे.

या नोटिसीमध्ये धोकादायक इमारतींच्या नावासमोर रहिवास वापर सुरु आहे अथवा नाही याचीही नोंद करण्यात आलेली आहे. इमारतीच्या वर्गीकरणानुसार इमारतींचा भोगवटा वापर/रहिवास करणा-या नागरिकांनी इमारत तात्काळ निष्कासीत करावयाची आहे किंवा वर्गीकरणानुसार नमूद केल्याप्रमाणे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणा-या भोगवटाधारकांनी इमारत दुरुस्त करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. याबाबत कोणत्याही प्रकारे धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी असे स्पष्ट करण्यात आले आहे.

तरी पावसाळा कालावधीत धोकादायक झालेल्या इमारतींचा / घरांचा वापर करणे धोक्याचे आहे. त्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ शकते.

म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा / घरांचा रहिवास / वापर तात्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे, अन्यथा दुर्दैवीरित्या अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील याची नोंद घ्यावयाची आहे.

# डोंगराळ भागात भाजणी (बाळणी) काम आटपले

डोंगराळ भागातील आदिवासी लोकांचे जीवनमान पावसाळ्यात पावसाच्या पाण्यावर शेतीवर अवलंबून असते पावसाळ्यात शेतीसाठी रोप तयार करण्यासाठी उन्हाळ्यातच राब, आदोर, डांब भाजतात हिवाळ्यात झाडांची पानगळ होण्याआधी काही ठराविक झाडांची वर चढून खांडणी केली जाते. कवी काळूदास कनोजे यांच्या कवितेतील ओळी

**"फांद्या झाडाच्या खांडूनी**
**दाड पथारीतो बाप**
**डोई मोळीला घेऊनी**
**माय टाकतेय धाप"**

झाड खांडणीनंतर उन्हात कवळी घातली जाते.कवळी कडक वाळेपर्यंत जमीन उन्हाळ्यात तापमान जास्त असल्याने तापली की त्यावर आदोर,डांब भरण्यासाठी झाडांच्या वाळलेल्या फांद्या मोडून पसरून देतात. वर वाळलेला चारा,झाडांचा वाळलेला पाणटा, गवताच्या पेंढ्या,सरवड पसरून पावसाळ्यातील साचलेले जनावरांच्या शेनवड गवर काही ठिकाणी पथारतात तर काही ठिकाणी रेसतात. कवी काळूदास कनोजे म्हणतात की,

**"साग सादड्याचा राब**
**वर गवताचा थर**
**काळ्या मातीनं रेसलं**
**माय कणसरीचं घर"**

मुडक्या सुप आदिवासी बोलीत सितर



म्हणतात. खाली त्रिकोणी आकाराच्या वाळलेल्या बांबूच्या किंबी बांधून त्यात वाळलेल्या लहान गवताचा भुगा गवर टाकून रेसून ठेवतात डोंगर उतारावर भात, नागली,वरई, शितोळी या पिकांच्या वाढीसाठी राब, आदोर, डांब तयार करून त्यावर काही ठिकाणी नदीचे वाळलेले मासे पळसाचे पानावर ठेवतात. मासे नसल्यास किंबीचा लहान मासा करतात, जंगलाला आग लागू नये म्हणून सभोवतालचं पाणट झाडून घेतात त्याला रीसा म्हणतात.

डांबाल,आदराल आग लाऊन भाजणी करतात,पावसाळ्यात भुज वाहून जाऊ नये म्हणून पाट काढून देतात त्याला आदिवासी बोलीत परवा म्हणतात. मागील वर्षी मे महिन्यातच पावसाने हजेरी लावली होती त्यामुळे लोकांची भाजणी राहून गेली होती. त्यामुळे धान्य उत्पादन कमी झाले ह्या वर्षी मे पाऊस न झाल्याने डोंगराळ भागात दऱ्याखोऱ्यात कडेकपारीत लोकांनी भाजणी काम आटपले आहे.

**सुभाष कामडी**
**(आदिवासी साहित्य अभ्यासक )**

# वाशिममध्ये अवैध डिझेल साठेबाजीवर प्रशासनाचा बुलडोझर!



## उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर मॅडम यांच्या धडक कारवाईने साठेबाजांचे धाबे दणाणले २०० लिटर अवैध डिझेल जप्त; जिल्ह्यात खळबळ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही साठेबाजांनी काळाबाजार आणि अवैध इंधन साठवणुकीचा उद्योग सुरू केल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. सामान्य नागरिकांना पेट्रोल पंपांवर तासनतास रांगेत उभे राहूनही डिझेल मिळत नसताना, काही जण मात्र गुप्तपणे ड्रम आणि कॅनमध्ये मोठ्या प्रमाणावर डिझेल साठवून ठेवत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. याच माहितीच्या आधारे उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर मॅडम यांनी महसूल विभागासह संयुक्त धडक कारवाई करत अवैध डिझेल साठेबाजांवर मोठा दणका दिला आहे.तोंडगाव नाका फाट्याजवळील सुनील धाडवे यांच्या ढाब्यावर ही कारवाई करण्यात आली. उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस व महसूल विभागाच्या पथकाने अचानक छापा टाकत परिसराची तपासणी केली. यावेळी विविध ड्रम आणि प्लास्टिक कॅनमध्ये लपवून ठेवलेले तब्बल २०० लिटर अवैध डिझेल आढळून आले.

कारवाईदरम्यान प्रशासनाने संपूर्ण साठा जप्त करत पंचनामा केला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून,अवैध इंधन साठवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.विशेष म्हणजे, उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर मॅडम यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून संपूर्ण कारवाईवर बारकाईने लक्ष ठेवले. त्यांच्या कडक आणि धडाकेबाज भूमिकेमुळेच ही मोठी कारवाई यशस्वी झाल्याची चर्चा जिल्हाभर रंगली आहे. सध्या वाशिम जिल्ह्यात डिझेल टंचाईमुळे अनेक ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी, वाहन चालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक डिझेलअभावी त्रस्त झालेले असताना काही जणांनी मात्र याच परिस्थितीचा गैरफायदा घेत काळाबाजार सुरू केल्याचे चित्र आहे. अशा प्रकारे ड्रममध्ये मोठ्या प्रमाणावर डिझेल साठवून ठेवणे अत्यंत धोकादायक मानले जाते. एखादी ठिणगी जरी पडली तरी मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे प्रशासनाने अशा प्रकारांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे.उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर मॅडम यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की,जिल्ह्यात कुठेही अवैध डिझेल साठवणूक, काळाबाजार किंवा जीवितास धोका निर्माण करणारे प्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. "कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना अजिबात सोडले जाणार नाही," असा कठोर संदेशही त्यांनी दिला.

या धडक कारवाईमुळे प्रशासन पुन्हा एकदा ॲक्शन मोडमध्ये आल्याचे स्पष्ट झाले असून, उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर मॅडम यांच्या नेतृत्वाखाली पुढील काळात जिल्हाभर अशाच संयुक्त कारवाया सुरू राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अवैध इंधन साठेबाजी करणाऱ्यांमध्ये या कारवाईनंतर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रशासनाचा सज्जड इशारा**

अवैध डिझेल साठवणूक हा गंभीर आणि जीवघेणा गुन्हा आहे. नागरिकांनीही अशा संशयास्पद प्रकारांची माहिती तात्काळ पोलिस किंवा महसूल प्रशासनाला द्यावी,असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी देवकर मॅडम यांनी केले आहे.

# या आयुर्वेदिक वनस्पती कंट्रोल करतात रक्तदाब ! रोजच्या वापराने हृदय राहील निरोगी

आजच्या काळात चुकीची जीवनशैली, वाढता ताण, अनियमित खाण्याच्या सवयी आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे उच्च रक्तदाबाचा धोका झपाट्याने वाढत आहे. पूर्वी ही समस्या वृद्धांमध्ये अधिक प्रमाणात आढळत होती, परंतु आता तरुणही रक्तदाबाच्या समस्येला बळी ठरत आहेत. उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' म्हटले जाते, कारण त्याची लक्षणे अनेकदा लगेच दिसून येत नाहीत, पण तो हृदय, मूत्रपिंड, मेंदू आणि डोळ्यांना नुकसान पोहोचवू लागतो. याकडे दुर्लक्ष केल्यास, हृदयविकाराचा झटका, पक्षाघात आणि मूत्रपिंडाशी संबंधित गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. आयुर्वेदिक आणि युनानी औषधशास्त्रातील तज्ञ डॉ. सलीम झैदी यांच्या मते, "सकस आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि तणाव कमी केल्याने रक्तदाब मोठ्या प्रमाणात नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते."

रक्तदाब म्हणजे शरीरातील रक्ताने आपल्या रक्तवाहिन्यांच्या भिंतींवर टाकलेला दाब. साधारणपणे १२०/८० mmHg हा सामान्य रक्तदाब मानला जातो. शरीराच्या सर्व अवयवांच्या योग्य कार्यासाठी रक्तदाब संतुलित असणे आवश्यक आहे. खूप कमी आणि खूप जास्त रक्तदाब दोन्ही आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी जीवनशैली आणि आहारात बदल करणे आणि वेळेवर औषधे घेणे आवश्यक आहे. आयुर्वेदिक तज्ञांच्या मते, "औषधांसोबतच नैसर्गिक उपाय देखील तुमचा रक्तदाब सामान्य ठेवण्यास मदत करू शकतात. आपल्या स्वयंपाकघरात आणि आजूबाजूला आढळणाऱ्या तीन अतिशय सामान्य औषधी वनस्पती नैसर्गिकरित्या रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात."


**चला जाणून घेऊया त्या औषधी वनस्पती कोणत्या आहेत आणि त्यांचे सेवन कसे करावे.**

**रक्तदाब का वाढतो?**

डॉक्टरांच्या मते, उच्च रक्तदाब वाढण्यामागे अनेक कारणे असू शकतात. सततचा ताण, जास्त प्रमाणात जंक फूड खाणे, जास्त मीठ आणि तळलेले पदार्थ खाणे, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा आणि इतर काही आजारांमुळे रक्तदाब वाढू शकतो. याशिवाय, जर कुटुंबातील कोणाला उच्च रक्तदाब असेल, तर मुलांमध्येही त्याचा धोका वाढतो.

**उच्च रक्तदाबामुळे शरीराचे काय नुकसान होते?**

दीर्घकाळ उच्च रक्तदाबामुळे हृदय आणि नसांवर अतिरिक्त दाब येतो. यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये सूज आणि अडथळा येण्याचा धोका वाढू शकतो, ज्यामुळे पुढे




हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघातासारखे गंभीर आजार होऊ शकतात. सतत उच्च रक्तदाबामुळे हृदयाचे कप्पे मोठे प्रसरण पावतात, किडनीचे नुकसान होऊ शकते आणि गंभीर प्रकरणांमध्ये दृष्टीवरही परिणाम होऊ शकतो.

**रक्तदाब वाढला आहे हे कधी ओळखावे?**

क्तदाब दोन आकड्यांत नोंदवला जातो. पहिला आकडा सिस्टोलिक रक्तदाब असतो. हृदय आकुंचन पावून रक्त धमन्यांमध्ये पंप करत असताना निर्माण होणारा दाब यात मोजला जातो. दुसरा आकडा डायस्टोलिक रक्तदाब असतो. दोन ठोक्यांमधील विश्रांतीच्या अवस्थेत धमन्यांवर पडणारा दाब यात दर्शविला जातो. जर सिस्टोलिक रक्तदाब १२० ते १३९ किलोग्रॅमच्या दरम्यान आणि डायस्टोलिक रक्तदाब ८० ते ८९ किलोग्रॅमच्या दरम्यान असेल, तर ती उच्च रक्तदाबाची पूर्वस्थिती मानली जाते. याउलट, जर रक्तदाब सातत्याने १४०/९० पेक्षा जास्त असेल, तर तो उच्च रक्तदाब मानला जातो आणि त्यावर उपचारांची आवश्यकता भासू शकते.

**उच्च रक्तदाबावर आयुर्वेदिक उपाय अर्जुनाच्या झाडाची साल का खावी?**

अर्जुनाच्या झाडाची साल उच्च रक्तदाबावर एक प्रभावी आयुर्वेदिक उपाय मानली जाते. यामुळे रक्तवाहिन्या शिथिल होण्यास मदत होते, ज्यामुळे रक्तदाब हळूहळू सामान्य होतो. याशिवाय, कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड्स कमी करण्यासही मदत होऊ शकते.

**सेवनाची पद्धत**

जर तुम्हाला नैसर्गिकरित्या रक्तदाब सामान्य करायचा असेल, तर ५ ग्रॅम अर्जुन झाडाच्या सालीची पावडर दीड कप पाण्यात उकळा. एक कप पाणी शिल्लक राहिल्यावर ते गाळून सकाळी प्या. रोज 'रिकाम्या पोटी हे पाणी प्यायल्यास रक्तदाब सामान्य होईल.

**अश्वगंधा: उच्च रक्तदाबावरील एक उपाय**

अश्वगंधा ही एक लोकप्रिय आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे, जी तणाव आणि चिंता कमी करण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाते. शांत झोपेला चालना देऊन आणि मानसिक तणाव कमी करून, ही वनस्पती उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

**सेवनाची पद्धत**

रक्तदाबाची पातळी सामान्य ठेवण्यासाठी, दिवसातून दोनदा ५ ग्रॅम अश्वगंधा पावडर पाण्याबरोबर सेवन करावी. याव्यतिरिक्त, आपण दिवसातून दोनदा एक ५०० मिग्रॅ अश्वगंधा कॅप्सूल घेऊ शकता.

**सर्पगंधा वनस्पती रक्तदाबावरही एक उपाय**

उच्च रक्तदाबासाठी सर्पगंधा ही सर्वात प्रभावी आयुर्वेदिक वनस्पतींपैकी एक मानली जाते. ती रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. त्यातील नैसर्गिक घटक शरीराला आराम देण्यास, तणाव कमी करण्यास आणि हृदयाचे ठोके संतुलित ठेवण्यास मदत करतात. तज्ञांच्या मते, सर्पगंधा रक्तवाहिन्यांवरील दाब कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते, ज्यामुळे रक्तदाब हळूहळू सामान्य होतो. याच कारणामुळे आयुर्वेदात उच्च रक्तदाबासाठी हे एक लोकप्रिय औषध मानले जाते. तथापि, याचे सेवन नेहमी योग्य प्रमाणात आणि डॉक्टर किंवा आयुर्वेदिक तज्ञांच्या सल्ल्यानुसारच केले पाहिजे, कारण जास्त प्रमाणात सेवन केल्यास काही लोकांना चक्कर येणे, अशक्तपणा किंवा रक्तदाब कमी होण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात

**सेवनाची पद्धत**

आयुर्वेदिक तज्ञ रक्तदाब सामान्य करण्यासाठी दररोज १०० ते २०० मिग्रॅ सर्पगंधा अर्क घेण्याची शिफारस करतात, परंतु डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच ते घेणे उत्तम.

जर एखाद्या व्यक्तीने आपली जीवनशैली आणि आहार बदलला नाही, तर त्याला दीर्घकाळ औषधोपचाराची गरज भासू शकते. परंतु निरोगी जीवनशैलीचा अवलंब केल्यास औषधांचे प्रमाण हळूहळू कमी करता येते. तथापि, कोणतेही औषध अचानक बंद करू नये. डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच हे औषध कमी करा किंवा बंद करा.

**उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी आवश्यक जीवनशैली टिप्स**

- रक्तदाब सामान्य करण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा. आपल्या दैनंदिन जीवनात निरोगी सवयींचा समावेश करा आणि तणाव कमी करण्याचा प्रयत्न करा.
- नियमित व्यायामामुळे रक्तदाब सामान्य राहण्यास मदत होते. आठवड्यातून किमान ५ दिवस ३० मिनिटे ते १ तास मध्यम व्यायाम केल्यास रक्तदाब सामान्य राहील.
- निरोगी आहार घेतल्यास तुमचा रक्तदाब सामान्य राहण्यास मदत होईल. आपल्या आहारात अतिरिक्त मीठ, तेलकट आणि प्रक्रिया केलेले पदार्थ टाळा. संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.